तरुण भारत मंगळवार, १७ डिसेंबर २०२४

# मनोहरराय सरदेसाई हे बहुआयामी व्यक्तिमत्त्व..!

## साहित्यिक, विचारवंत उदय भेंब्रे यांचे प्रतिपादन : सांखळी सरकारी महाविद्यालयात राष्ट्रीय परिसंवाद उत्साहात

प्रतिनिधी
पणजी

मनोहरराय सरदेसाई यांनी आपल्या बहुमूल्य योगदानाने कोंकणी भाषेला समृद्ध केले. कोंकणी चळवळ, शिक्षण तसेच साहित्य क्षेत्रात त्यांनी ऐतिहासिक कामगिरी केली. मनोहरराय सरदेसाई हे बहुआयामी व्यक्तिमत्त्व होते, असे प्रतिपादन साहित्यिक, कादंबरीकार आणि विचारवंत उदय भेंब्रे यांनी केले.



सांखळी : मनोहरराय सरदेसाई जीण आनी वावर' या विषयावरील राष्ट्रीय परिसंवादाच्या उद्घाटन प्रसंगी साहित्यिक उदय भेंब्रे, वसंत सावंत, प्राचार्य डॉ. नामदेव गावस, के. श्रीनिवासराव व इतर मान्यवर.

सांखळी कला, विज्ञान आणि वाणिज्य सरकारी महाविद्यालय कोंकणी विभाग, गोवा कोंकणी अकादमी, राजभाषा संचालनालय आणि साहित्य अकादमी नवी दिल्ली यांच्या विद्यमाने मनोहरराय सरदेसाई यांच्या जन्मशताब्दीनिमित्त 'मनोहरराय सरदेसाई जीण आनी वावर' या विषयावरील आयोजित केलेल्या राष्ट्रीय परिसंवादाच्या उद्घाटन प्रसंगी भेंब्रे बोलत होते.

यावेळी सन्मानीय अतिथी म्हणून गोवा कोंकणी अकादमीचे अध्यक्ष वसंत सावंत, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नामदेव गावस, साहित्य अकादमी नवी दिल्लीचे सचिव के. श्रीनिवासराव, साहित्य अकादमी कोंकणी सल्लागार मंडळाचे निमंत्रक मेल्विन रॉड्रिगीस, साहित्य अकादमी मुंबई प्रादेशिक कार्यालयाचे प्रभारी ओम प्रकाश नागर, गोवा कोंकणी अकादमीचे सचिव पराग नगर्सेकर सुनील सरदेसाई उपस्थित होते.

उद्घाटनसत्राच्या अध्यक्षपदी साहित्य अकादमी कोंकणी सल्लागार मंडळाचे निमंत्रक मेल्विन रॉड्रिगीस हे होते. ओम प्रकाश नागर यांनी सूत्रसंचालन करून आभार मानले.

समारोप सोहळ्यास प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ कवी दशरथ परब उपस्थित होते. हेन्री मेंडोसा यांनी परिसंवादाविषयीचे टिपण सादर केले. विद्यार्थिनी सुरभना गावकर हिने सूत्रसंचालन केले. प्रा. उर्वशी नाईक यांनी आभार मानले.

### मान्यवरांनी उलगडले मनोहरराय सरदेसाई साहित्याचे अंतरंग

१. डॉ. पूर्णानंद च्यारी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या पहिल्या सत्रात डॉ. सोनिया सिरसाट म्हणाल्या की मनोहरराय सरदेसाई यांची कविता काव्यलकारांनी नटलेली आहे.
२ मनोहरराय सरदेसाई यांच्या कवितेत आढळणारा सामाजिक स्वर त्या काळातील समाज जीवन दर्शवितो, असे डॉ.राजय पवार म्हणाले.
३. हेन्री मेंडोसा यांनी मनोहरराय सरदेसाई यांच्या कवितेते तत्त्वज्ञान आणि व्यक्तिमत्त्व यांचा सुरेख मेळ झाला असल्याचे सांगून त्यांच्या कवितेची शैली विशद केली.
४. दुसऱ्या सत्रात उमेश मनोहर सरदेसाई, लोकसाहित्याचे अभ्यासक डॉ. पांडुरंग फळदेसाई, लुईस गोमीश यांनी लिहिलेले शोधनिबंध सादर केले.

### सरदेसाई यांच्या साहित्यात जनसामान्यांची वेदना : श्रीनिवासराव

कोंकणी ही बोलायला गोड भाषा आहे, या राममनोहर लोहिया यांच्या विधानाचा आधार घेत साहित्य अकादमीचे केंद्रीय सचिव के. श्रीनिवासराव यांनी मनोहरराय सरदेसाई यांच्या कवितेत जनसामान्यांची वेदना आणि भाषेविषयीची अस्मिता प्रखरतेने जाणवते असे सांगून त्यांनी आपले अनुभव कथन केले.